(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**हिंदुस्तान एज्युकेशन सोसायटी आणि अन्य**
**विरुद्ध**
**एस के. कलीम एस के. गुलाम नबी आणि इतर**
**१० मार्च १९९७**
**[न्यायमूर्ती- के. रामास्वामी आणि जी. टी. नानावटी )**

**सेवाविषयक विधी:**

**महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] विनियमन अधिनियम, १९७७.**

कलम ५-अस्थायी नियुक्ती-११ महिन्यांसाठी अस्थायी नियुक्ती- नियमाधीन करण्याचा दावा उच्च न्यायालयाने मान्य केला- अधिनिर्णित, नियुक्ती ही स्थायी नियुक्ती मानली जाऊ शकत नाही-उच्च न्यायालयाने असे निर्देश जारी केले की उत्तरवादी क्र. १ ची नियमित नियुक्ती स्पष्टपणे बेकायदेशीर आहे आणि ती बाजूला सारली जाते.

**दिवाणी अपील न्यायाधिकार क्षेत्र: दिवाणी अपील क्रमांक १९७१/१९९७**

बॉम्बे उच्च न्यायालयाच्या रिट याचिका (W.P.) क्रमांक ५८२१/१९९५ मधील दिनांक ३१. ७. ९६ च्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्याची बाजू एस. व्ही. देशपांडे यांनी मांडली.

न्यायालयाने खालील आदेश दिला :

उत्तरवादी क्र. १ ने नोटीस स्वीकारण्यास नकार दिल्याचे नोंदवले जात असल्याने, ती पुरेशी नोटीस मानली गेली पाहिजे. उत्तरवादी क्रमांक ५ आणि ७ यांना नोटीस बजावण्यात आली आहे. परंतु ते व्यक्तिशः किंवा त्यांच्या वकिलामार्फत हजर होत नाहीत.

अनुमती देण्यात आली .

उत्तरवादी व्यक्तीशः किंवा वकिलाच्या माध्यमातून हजर होत नसल्यामुळे, आम्ही अपीलकर्त्यांची बाजू मांडणारे विद्वान वकील श्री देशपांडे यांची मदत घेतली आहे आणि नियुक्तीचे संबंधित नियम आणि आदेश तपासले आहेत. मान्य स्थिती अशी आहे की, उत्तरवादी क्रमांक १ ची नियुक्ती १० जून १९९२ रोजी खालील अटींसह निर्बाध रिक्त पदावर करण्यात आली होती:

> " तुमची नियुक्ती ही दिनांक ११.६.१९९२ ते १०.५.१९९३ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी निर्बाध रिक्त पदावर पूर्णपणे अस्थायी आहे. वरील कालावधी संपल्यानंतर तुमची सेवा कोणत्याही सूचनेशिवाय संपुष्टात येईल."

अशा प्रकारे, हे पाहिले जाऊ शकते की पहिल्या प्रतिवादीची नियुक्ती ही केवळ रिक्त जागेच्या विरुद्ध अस्थायी नियुक्ती होती. महाराष्ट्र खाजगी

शाळेतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] विनियमन अधिनियम, १९७७. च्या तरतुदींनुसार या नियुक्त्यांचे विनियमन आणि नियंत्रण केले जाते. अधिनियमाचे कलम ५ खालील प्रतिपादन करतेः

"५. खाजगी शाळांच्या व्यवस्थापनावरील विवक्षित आबंधने

( १) व्यवस्थापन,खाजगी शाळेतील प्रत्येक स्थायी रिकामे पद , शक्य तितक्या लवकर, विहित करण्यात आलेल्या रीतीने अशा रिकाम्या पदासाठी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून भरील :

परंतु असे रिकामे पद पदोन्नतीद्वारे भरण्यात यावयाचे नसेल तर व्यवस्थापन, असे रिकामे पद भरण्याच्या बाबतीत कार्यवाही करण्यापूर्वी शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई किंवा यथास्थिती शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून , त्यांनी अन्य शाळांमध्ये समावेशनाकरिता ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तींच्या यादीमधून कोणतीही योग्य व्यक्ती उपलब्ध होण्याजोगी आहे किंवा कसे याची खात्री करून घेईल व अशी कोणतीही व्यक्ती उपलब्ध असेल त्या बाबतीत व्यवस्थापन, त्या व्यक्तीची अशा रिकाम्या पदावर नेमणूक करील.

(२) स्थायी रिकामे पद भरण्यासाठी नियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन असेल. पोट-कलम (४) आणि

(५) च्या तरतुदींना अधीन राहून, त्याच्या दोन वर्षांच्या हा परिवीक्षा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्याला कायम करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

( ३) व्यवस्थापनाच्या मते, कोणत्याही परिवीक्षाधीन व्यक्तीचे परिवीक्षाधीन कालावधीतील काम किंवा वर्तन समाधानकारक नसेल, तर व्यवस्थापन त्याला एक महिन्याची नोटीस किंवा नोटीसच्या बदल्यात एक महिन्याचा पगार दिल्यानंतर उक्त कालावधीत कोणत्याही वेळी तिची सेवा समाप्त करू शकते.

( ४) एखाद्या परिवीक्षाधीन व्यक्तीची सेवा पोट-कलम (३) खाली समाप्त करण्यात आल्यास , आणि ज्या दिनांकास तिची सेवा समाप्त करण्यात आली त्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत तिला त्याच शाळेत किंवा व्यवस्थापनाच्या मालकीच्या दुसऱ्या कोणत्याही शाळेत पुन्हा नेमण्यात आल्यास , पोट-कलम (२) च्या प्रयोजनासाठी परिवीक्षेच्या आवश्यक कालावधीची गणना करण्यासाठी , तिने परिवीक्षाधीन म्हणून आधीच व्यतीत केलेला कालावधी विचारात घेण्यात येईल.

(४-क) पोट -कलम (१) च्या परंतुकाअन्वये तरतूद केल्याप्रमाणे, पदोन्नतीद्वारे किंवा समावेशनाद्वारे कायम रिक्त पद भरण्यासाठी

नेमलेल्या व्यक्तीस , पोट-कलम (२), (३) किंवा (४) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(५) व्यवस्थापनाला प्रत्येक अस्थायी रिकामे पद, अशा रिकाम्या पदावर यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून भरता येईल . नेमणुकीचा आदेश , त्या बाबतीत विहित करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये काढण्यात येईल आणि त्यात अशा व्यक्तीच्या नेमणुकीचा कालावधी नमूद करण्यात येईल.

वरील बाबी आणि नियुक्तीचा आदेश लक्षात घेता, उत्तरवादीची नेमणूक मर्यादित कालावधीसाठी पूर्णपणे अस्थायी होती. अर्थात, सक्षम प्राधिकरणाने दिलेली मंजुरी त्या अस्थायी नियुक्तीसाठी होती. स्थायी नियुक्त्यांच्या संदर्भात, ते अधिनियमाच्या कलम ५ च्या पोटकलम (१) आणि (२) द्वारे नियंत्रित केले जातात, त्यानुसार व्यवस्थापन, खाजगी शाळेतील प्रत्येक कायमस्वरुपी रिक्त जागा, विहित पद्धतीनुसार, अशा रिक्त पद भरण्यासाठी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून लवकरात लवकर भरेल. अशा प्रकारे नेमण्यात केलेल्या प्रत्येक व्यक्तीला पोट -कलम (४) आणि (५) च्या तरतुदींच्या अधीन राहून दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन केले जाईल.दोन वर्षांचा परिवीक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्याला कायम केले जाईल.

अशा परिस्थितीत, उत्तरवादीची नियुक्ती ही स्थायी नियुक्ती मानली जाऊ शकत नाही. परिणामी, उच्च न्यायालयाने ३१ जुलै १९९६ रोजी रिट याचिका क्र. ५८२१/९५ मध्ये, त्यांची नियमितपणे नियुक्ती करण्यात आली होती, असा आक्षेपित निकाल देताना दिलेला निर्देश स्पष्टपणे बेकायदेशीर आहे आणि तो कायम ठेवला जाऊ शकत नाही.

सबब, अपील मान्य करण्यात येते. उच्च न्यायालयाचा आदेश उलटवला जातो आणि रिट याचिका फेटाळली जाते. खर्चाबद्दल कोणतेही आदेश नाही.

आर. पी. (R. P. ) अपील मान्य करण्यात आले.

****

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल."

****